# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 21 September 2024

## Time: 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २१ सप्टेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त नागरिकांमध्ये सागरी प्रदूषणाविषयी जागरुकता निर्माण करणं आणि स्वच्छतेचं महत्त्व पटवून देणं यासाठी आज मुंबईत जुहू किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे.

आपला सागरी किनारा स्वच्छ असेल तर आपल्याकडे पर्यटनासाठी पर्यटक येतील. त्यामुळे किनाऱ्यावरची स्वच्छता ही आपली सर्वांची जबाबदारी असल्याचं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. स्वच्छता ही आपल्या सर्वांच्या आरोग्यासाठी अत्यंत गरजेची आहे, ही बाब विचारात घेऊन डीप क्लिन ड्राइव्ह ही मोहीम हाती घेण्यात आली आहे आणि ही मोहीम अशीच पुढे सुरू राहणार असल्याचही ते म्हणाले. 'स्वच्छता हीच सेवा' या मोहिमेत राज्यातल्या जवळपास चार हजार गावांचा सहभाग असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यासह देशातल्या किनारपट्टीवरच्या सर्व १३ राज्यांमध्ये आज ही स्वच्छता मोहीम राबवली जात आहे.

****

आम आदमी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आतिशी मार्लेना आज दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. हा शपथ ग्रहण सोहळा आज दिल्लीतल्या राज निवास इथे होईल, दिल्लीचे उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना आतिशी यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळाचे सदस्य गोपाल राय, कैलाश गहलोत, सौरभ भारद्वाज, इमरान हुसैन आणि मुकेश अहलावत यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा २४ आणि २५ सप्टेंबरला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. शहा यांच्या २४ तारखेला नागपूर, छत्रपती संभाजीनगर इथं आणि २५ तारखेला नाशिक, तसंच कोल्हापूर इथं भाजप कार्यकर्त्यांशी संवाद बैठका होणार आहेत.

****

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांचं सुसूत्रीकरण करण्यात आलं आहे. या सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे बृहन्मुंबई क्षेत्रातल्या मतदान केंद्रांची संख्या १० हजार १११ झाली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या तुलनेत मतदान केंद्रांच्या संख्येत २१८ ने वाढ झाली आहे. यामध्ये प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी १ हजार ५०० मतदारांची संख्या आता सरासरी १ हजार २०० पर्यंत असेल. मतदान केंद्रांची संख्या वाढल्यामुळे मतदानाचं प्रमाण आणि वेग वाढण्यास मदत होणार आहे.

****

मागील पाच दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांचं अंतरवाली सराटीत आमरण उपोषण सुरू आहे.  मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सगे सोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी केली जावी. हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागू करावं. अंतरवाली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमित्तानं दाखल झालेले गुन्हे मागे घेतले जावे या मागण्यांसाठी हे आंदोलन सुरु आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आज बीड जिल्हा बंदचं आवाहन करण्यात आलं आहे. या बंदच्या पार्श्वभूमीवर पोलिस यंत्रणा सतर्क असून बीड शहर पोलिस ठाणे अंतर्गत विशेष पोलिस यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. या बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार हिंसक घटना घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क आहे. तसंच जिल्ह्यात कलम १४४ लागू करण्यात आलं आहे. हा बंद शांततेत करण्याचं आवाहन पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी केलं आहे.

****

२०२३-२४ या आर्थिक वर्षात देशभरात डिजिटल पद्धतीने झालेल्या व्यवहारांमध्ये वाढ झाली असून १९ हजार कोटी डिजिटल व्यवहार झाले आहेत . २०१७-१८ या आर्थिक वर्षात २ हजार कोटींहून अधिक डिजिटल व्यवहार झाले होते. या कालावधी दरम्यान युपीआय अर्थात यूनिफाइड पेमेंट्स इंटरफेस च्या माध्यमातून झालेल्या व्यवहारांमध्ये देखील ९० कोटींनी वाढ झाली असून १३ हजार कोटींहून अधिक युपीआय व्यवहार या काळात झाले आहेत. तर २०२३-२४ या आर्थिक

वर्षात युपीआयच्या माध्यमातून २०० लाख कोटी रुपयांची देवाणघेवाण देशभरात झाली आहे. सध्या संयुक्त अरब अमिरात, सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स, आणि मॉरीशस या ७ देशांमध्ये युपीआय व्यवहार सुरु आहेत.

****

राज्यातल्या सर्व विभागांमध्ये आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****

भारत आणि बांगलादेश यांच्यात चेन्नईत सुरू असलेल्या पहिल्या क्रिकेट कसोटी सामन्यात आज तिसऱ्या दिवशी भारतानं ३ गडी बाद ८१ धावसंख्येवरुन खेळाला सुरुवात केली. शेवटचं वृत्त हाती  आलं तेव्हा भारताच्या ३ गडी बाद १४५ धावा झाल्या आहेत. तत्पुर्वी भारताचा पहिला डाव ३७६ धावांवर संपुष्टात आला. तर बांगलादेशचा संघही आपल्या पहिल्या डावात १४९ धावांवर सर्वबाद झाला. काल दुसऱ्या दिवशीच्या खेळात भारतानं ३०८ धावांची आघाडी घेतली होती.

****